कैलास नागरे यांची आत्महत्या नसून शासनाने बळी घेतला आहे : आमदार सिद्धार्थ खरात यांची शासनावर टीका >>पान 2

अधिवेशनाच्या चार आठवड्यामध्ये आम्ही दररोज नऊ तास काम केलं >>पान 3

नियतीने बापाचे छत्र हिरावले अन् जगण्याने बालपणातच छळले >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

**सुविचार**
जीवनात प्रेमाचा मार्ग स्वीकारा.

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



कंगना राणौतला तिचे वडील डॉक्टर बनवू इच्छित होते, ती बनली बॉलिवूडची क्वीन
आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 224 ■ शुक्रवार, दि. 28 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## मोदी सरकार ओला-उबेरसारखी टॅक्सी सेवा सुरु करणार!

नवी दिल्ली,: केंद्र सरकार लवकरच ओला, उबेरसारखी टॅक्सी सेवा सुरु करणार आहे. सहकारी टॅक्सी सेवा लवकरच सुरु केली जाणार असल्याची घोषणा गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेत केली.

अमित शहा म्हणाले, 'सहकारातून समृद्धीचा नारा हा केवळ एक नारा नाही तर आम्ही तो प्रत्यक्षात अंमलात आणला आहे. काही महिन्यांत सहकारी टॅक्सी सेवा येत आहे. ही सहकारी सेवा चारचाकी वाहने, ऑटो आणि दुचाकी वाहनांची नोंदणी करेल. या सेवेत नोंदणी केल्यानंतर, संपूर्ण फायदा थेट ड्रायव्हरला मिळेल. मोठा भाग कोणत्याही श्रीमंत माणसाच्या हातात जाणार नाही. पुढे बोलताना ते म्हणाले की, उबेर आणि ओला सारख्या कंपन्यांच्या सहकार्याने टॅक्सी चालवणाऱ्या चालकांना त्यांच्या कमाईचा काही भाग द्यावा लागतो. सबस्क्रिप्शन फी भरावी लागते आणि ड्रायव्हर्सना प्रत्येक राईडवर कंपनीला एक निश्चित कमिशन देखील द्यावे लागते. मात्र, आता सहकारी सेवांमुळे यातून मिळणारा संपूर्ण नफा थेट ड्रायव्हरला जाईल आणि त्याच्याकडून कोणतेही कमिशन घेतले जाणार नाही.

सहकारी टॅक्सी सेवांमुळे, दिल्ली, मुंबई, लखनौ, पटना, कोलकाता, चेन्नई, हैदराबाद आणि बेंगळुरू सारख्या शहरांमध्ये वाहतूक व्यवस्थेत मोठी सुधारणा होऊ शकते. आतापर्यंत लोकांना ओला आणि उबर सारख्या टॅक्सी सेवांवर अवलंबून राहावे लागत होते. सुरुवातीच्या टप्प्यात, या टॅक्सी सेवांमुळे चालकांना खूप फायदा झाला.

परंतु आता कंपन्यांनी त्यांचे कमिशन वाढवले आहे. अशा परिस्थितीत, टॅक्सी सेवेतून होणाऱ्या नफ्यात चालकांचा वाटा लक्षणीयरीत्या कमी झाला आहे. याकडे लक्ष वेधत अमित शहा म्हणाले की, आता टॅक्सी सेवेचा नफा श्रीमंतांकडे जाणार नाही तर त्याचा पूर्ण फायदा चालकांना मिळेल.

## अखेर पापाचा घडा भरला! संतोष देशमुख हत्येप्रकरणातील आरोपींची हत्येची कबुली



दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील नवीन अपडेट समोर आली आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या केल्याप्रकरणी अटक केलेल्या आरोपींपैकी मुख्य तीन आरोपींनी हत्येची कबुली दिली असल्याची माहिती मिळाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात वाल्मीक कराड, विष्णू चाटे, सुदर्शन घुलेसह आठ आरोपी आहेत. यातील कृष्णा आंधळे हा अद्यापही फरार आहे. याबाबत केज न्यायालयात सुनावणी झाली. परंतु, सुरक्षेचे कारण देत सीआयडीने हे प्रकरण बीड न्यायालयात चालवावे, अशी विनंती केली होती. त्याप्रमाणे बुधवारी पहिली सुनावणी बीड न्यायालयात पार पडली. यावेळी विशेष सरकारी वकील ॲड. उज्वल निकम यांनी ३२ मिनिटांत खंडणी ते हत्या हा घटनाक्रम मांडला. तसेच सीसीटीव्ही फुटेज, सीडीआर, टॉवर लोकेशन, ऑडिओ-व्हिडीओ रेकॉर्डिंग असे पुरावे असल्याचे सांगितले. हेच पुरावे आम्हाला देण्यात यावेत, अशी विनंती आरोपींच्या वकिलांनी अर्ज करून केली. आता पुढील सुनावणी १० एप्रिल रोजी होणार आहे. त्याआधीच हत्येचा प्रमुख आरोपी सुदर्शन घुलेने पोलिसांसमोर कबूल केले आहे की, त्यानेच संतोष देशमुखांचे अपहरण करून हत्या केली. याशिवाय, जयराम चाटे आणि महेश केदार यांनी देखील यासंबंधी आपली कबुली दिली असल्याची बातमी समोर आली आहे. सुदर्शन घुलेच्या कबुली नंतर वाल्मिक कराड अडचणीत येणार का हे पाहणं महत्त्वाचं ठरेल.

# मंत्रालयात ऑनलाईन ॲपद्वारे मिळणार प्रवेश




दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : मंत्रालय सुरक्षा प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पातंर्गत पहिल्या टप्प्यात चेहरा ओळख आधारित प्रवेश प्रक्रिया कार्यान्वीत करण्यात आली. तसेच टप्पा २ अंतर्गत प्रवेशासाठी व्हीजीटर मॅनेजमेंट सिस्टीम प्रणाली विकसित करण्यात आली आहे. मंत्रालयात क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, अभ्यागत यांना यापुढे कोणत्याही कामाकरीता प्रवेश हवा असल्यास त्यांना 'डिजीप्रवेश' या ऑनलाईन ॲप आधारित प्रणालीद्वारे मंत्रालयात प्रवेश मिळणार आहे.**

अभ्यांगतांना मंत्रालयाच्या ज्या विभागात कामानिमित्त प्रवेश आवश्यक आहे. केवळ त्यांना दिलेल्या वेळेत आणि अनुज्ञेय असलेल्या मजल्यावरच प्रवेश करावा. अनधिकृत मजल्यावर प्रवेश केल्यास अभ्यागत कारवाईस पात्र राहतील. अभ्यागतांनी संबंधित विभागातील आपले काम पूर्ण झाल्यावर विहीत वेळेत मंत्रालयातून बाहेर पडावे. ज्येष्ठ नागरीक व दिव्यांग अभ्यागतांना रांगेत उभे राहण्यामुळे होणारा त्रास विचारात घेता त्यांना दुपारी १२ वाजता प्रवेश देण्यात येईल. तर दुपारी १२ नंतर ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग अभ्यांगत यांचेसाठी स्वतंत्र रांगेची व्यवस्था राहील. तसेच ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग अभ्यांगत यांनी तत्संबंधीचे वैध प्रमाणपत्र सोबत ठेवणे आवश्यक आहे.

मंत्रालयात येणाऱ्या सर्व अभ्यागतांना दुपारी २ वाजेनंतर प्रवेश देण्यात येईल. अशा प्रवेशासाठी त्यांना डिजीप्रवेश या ऑनलाईन ॲप आधारीत प्रणालीद्वारे मंत्रालय प्रवेशपास घेऊन मंत्रालयात प्रवेश मिळविता येईल. अभ्यागतांनी मंत्रालयात प्रवेश मिळविण्यासाठी आधार कार्ड, वाहन परवाना, पॅन कार्ड आदी शासन मान्य ओळखपत्र सादर करणे आवश्यक आहे. अशिक्षीत तसेच स्मार्टफोन नसलेल्या अभ्यांताकरीता गार्डन गेट येथे ऑनलाईन ॲप आधारीत प्रणालीद्वारे मंत्रालय प्रवेश नोंदणीकरीता तसेच मदतीकरीता एक खिडकी उपलब्ध असणार आहे.

'डिजीप्रवेश' ॲपद्वारे आपली नोंदणी केल्यानंतर मिळणाऱ्या क्यू आर कोड आधारे मंत्रालयाबाहेर असलेल्या खिडकीवर मंत्रालय प्रवेशाकरिता आरएफआयडी कार्ड वितरीत करण्यात येईल. हे आरएफआयडी कार्ड आधारे सुरक्षाविषयक तपासणी करून मंत्रालयात प्रवेश देण्यात येईल. अभ्यागतांना आरएफआयडी प्रवेश ओळखपत्र परिधान करणे व मंत्रालयातून बाहेर जाताना ते सुरक्षा कर्मचाऱ्यांकडे जमा करणे बंधनकारक राहील.



### अभ्यागतांनी अशी करावी नोंदणी

'डिजीप्रवेश' ॲप हे मोबाईल ॲप ॲण्ड्राईड आणि आयओएस पल या दोन्ही प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आले आहे. आपल्या मोबाईल च्या प्रणालीनुसार ॲण्ड्राईडमध्ये प्ले स्टोअर वर तर आयओएस ॲपलवर ॲपल स्टोअरवर digi pravesh हे सर्च केल्यास हे ॲप विनामुल्य डाऊनलोड करता येते. या ॲपवर सुरूवातीला केवळ एकदाच नोंदणी करणे आवश्यक राहील. नोंदणी झाल्यानंतर आधार क्रमांकावर आधारीत यंत्रणेद्वारे छायाचित्राची ओळख पटवून नोंदणी पूर्ण केल्यानंतर ज्या विभागात काम आहे, त्याचा स्लॉट बुक करून रांगेशिवाय प्रवेश घेता येईल. या संपूर्ण प्रक्रियेला तीन मिनीटांपेक्षा कमी कालावधी लागतो.

## मुंबईतील गृहसंकुल पुनर्विकासासाठी महाप्रीत – एनबीसीसी यांच्यात सामंजस्य करार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महात्मा फुले नविनीकरणीय उर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रीत) व एनबीसीसी (इंडिया) लिमिटेड, नवी दिल्ली गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाच्या अंतर्गत भारत सरकारची नवरत्न कंपनी यामध्ये विविध पायाभूत सुविधांचे प्रकल्प राबविण्याकरिता मुंबई येथे सामंजस्य करार करण्यात आला.

एनबीसीसी (इंडिया) लिमिटेड या कंपनीची मोठे गृहनिर्माण प्रकल्प, आयटी इमारतींचे बांधकाम तसेच स्वदेशात आणि परदेशात पायाभूत सुविधा प्रकल्पांची संकल्पना व अंमलबजावणी करणे आणि अशा प्रकल्पांना निधी देण्याच्या क्षेत्रात कार्यरत आहे.

ठाणे क्लस्टर डेव्हलपमेंट प्रोजेक्ट, भिवंडी महानगरपालिका आणि चंद्रपूर महानगरपालिका या प्रमुख प्रकल्पांमध्ये पीएमएवाय आणि परवडणाऱ्या गृहनिर्माण प्रकल्पांची अंमलबजावणी महाप्रीत करत आहे. मुंबईत सुमारे ५६ एसआरए प्रकल्प महाप्रित राबविणार आहे. एमएमआर आणि विशेषतः मुंबई शहरातील विविध खाजगी सहकारी गृहसंकुल संस्थांनी त्यांच्या परिसराचा पुनर्विकासासाठी महाप्रितसोबत चर्चा केली आहे. या सामंजस्य कराराअंतर्गत मुंबई शहरातील गृहसंकुलाची गरज पूर्ण करण्याकरिता महाप्रित आणि एनबीसीसी या कंपन्या सहकार्य करणार आहेत.

महाप्रीत ईएसजी अनुपालन, स्वच्छ आणि हरित ऊर्जा निकषांचा अवलंब, कचरा पुनर्वापर, डीकार्बोनाइज्ड साहित्य, नवीनतम आणि पर्यावरणपुरक लवचिक बांधकाम तंत्रज्ञान, राष्ट्रीय पर्यावरणपूरक मानके, राज्यातील दुर्बल घटकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि प्रकल्प देखरेखीसाठी आंतरराष्ट्रीय मानके यावर लक्ष केंद्रित करीत आहे. प्रकल्पांच्या अंमलबजावणीकरिता महाप्रित कंपनी अग्रस्थानी आहे. तसेच महाप्रित आणि एनबीसीसी (इंडिया) लिमिटेडची तज्ज्ञता व कौशल्यामुळे होणारे फायदे लक्षात घेता, दोन्ही सरकारी संस्थांनी समान हितांच्या प्रकल्पांवर पीएमसी अथवा ईपीसी तत्वावर प्रकल्प राबविण्याचे ठरविले आहे.

यावेळी महाप्रीतचे व्यवस्थापकीय संचालक बिपिन श्रीमाळी म्हणाले, एनबीसीसी आणि महाप्रित यांच्यातील सहकार्यामुळे पुनर्विकास कार्य करण्यास मदत होईल व गृहसंकुलांना पुनर्विकास करण्याची संधी प्राप्त होईल. तसेच केंद्र सरकारच्या संस्थांना विकासकांची निवड करण्याचे पर्याय उपलब्ध होत असल्यामुळे, पुनर्विकासांची कामे राज्य शासनाच्या नियमानुसार करण्यात येईल.

एनबीसीसीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक के. पी. महादेवस्वामी म्हणाले, एनबीसीसी (इंडिया) मुंबई आणि महाप्रित यांच्या संयुक्त सहकार्यामुळे मुंबई व मुंबई परिसरातील पुनर्विकासांची प्रकल्प राबविण्यात येतील. तसेच अशाच प्रकारचे प्रकल्प नवी दिल्ली व इतर राज्यांमध्ये संयुक्तपणे राबविण्यात येतील.

यावेळी महाप्रीतचे संचालक पुरुषोत्तम जाधव, कार्यकारी संचालक सुभाष नागे, प्रकल्प संचालक पी. आर.के. मुर्ती, कार्यकारी संचालक सुनील पोटे तसेच एनबीसीसी (इंडिया) नवी दिल्लीचे कार्यकारी संचालक प्रदिप शर्मा, कार्यकारी संचालक प्रविण डोईफोडे व इतर अधिकारी उपस्थित होते.

## हृदयद्रावक! अंगणात बागडत होती, फुगा फुगवताना तोंडातच फुटला, ८ वर्षाच्या डिंपलचा श्वास कोंडून मृत्यू, धुळे हळहळले

**धुळे/प्रतिनिधी :** अंगणात खेळत असताना फुगा फुगवताना ८ वर्षाच्या चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना धुळ्यातील यशवंत नगर मध्ये घडलीय. फुगा फुगवताना तोंडातच तो फुटला आणि घशात त्या फुग्याचा तुकडा अडकल्याने तिचा श्वास कोंडला. श्वास घेण्यास त्रास होतोय हे लक्षात येताच घरच्यांनी तिला तातडीने जवळच्या खासगी रुग्णालयात नेलं. पण तोपर्यंत उशीर झाला होता. डॉक्टरांनी मुलीस तपासून मृत घोषीत केले. या घटनेमुळे कुटुंबियांवर दु:खाचा डोंगर कोसळलाय. या घटनेनं परिसरात हळहळ व्यक्त केली जातेय. डिंपल मनोहर वानखेडे असं या मुलीचं नाव होतं. (प्लत) रबरी फुगा तोंडात फुटल्यानं त्या फुग्याचे तुकडे श्वासनलिकेत अडकल्याने आठ वर्षाच्या चिमूकलीला जीव गमवावा लागलाय.



धुळे शहरातील यशवंत नगर, साक्री रोड येथे आपल्या घराच्या अंगणात फुगा फुगवत असताना तो अचानक फुटल्याने डिंपल मनोहर वानखेडे (वय ८) या चिमुकलीच्या घशात त्या फुग्याच्या तुकडा अडकल्याने तिला श्वास घेण्याचा त्रास होऊ लागला ही गोष्ट तिच्या घरच्यांना कळताच त्यांनी क्षणाचा ही विलंब न करता तिला तातडीने आपल्या खाजगी वाहनाने जिल्हा रुग्णालयात दाखल केले मात्र या दरम्यान डॉक्टरांनी तिला तपासून मृत घोषित केले... अवघ्या आठ वर्षीय डिंपल आपल्या अंगणात खेळत असताना फुगा फुगवताना झालेल्या या दुर्घटनेत तिचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. फुगा फुगवताना तो तोंडातच फुटल्याने ही घटना घडल्याचे सांगण्यात येत आहे.

# राज्य परिवहन महामंडळ बुलढाणा विभागात विविध पदासाठी भरती

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा /प्रतिनिधी :** राज्य परिवहन महामंडळ बुलढाणा विभागामार्फत विविध पदाकरीता शिकाऊ उमेदवारांची पदभरती करण्यात येणार आहे. तांत्रिक, व्यावसायिक व आयटीआय उत्तीर्ण कार्यशाळा शिकाऊ उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी करुन आवश्यक कागदपत्रासह १२ एप्रिल २०२५ पर्यंत अर्ज सादर करावा, असे आवाहन राज्य परिवहन विभाग नियंत्रक यांनी केले आहे.

**मेकॅनिक मोटार व्हेईकल (MMV) पदासांठी पात्रता**

आयटीआय मेकैनिक मोटार व्यवसाय उत्तीर्ण(३८ पदे). मेकॅनिक(डिझेल) पदासाठी पात्रता - आयटीआय मेकॅनिक(डिझेल) व्यवसाय उत्तीर्ण(१६ पदे). मोटार व्हेईकल बॉडी बिल्डर(MVBB) पदासाठी पात्रता - आयटीआय मोटार व्हेईकल बॉडी बिल्डर व्यवसाय उत्तीर्ण(१६ पदे). इलेक्टीशियन पदासाठी पात्रता- आयटीआय मोटार व्हेईकल बॉडी बिल्डर व्यवसाय उत्तीर्ण(११ पदे), पेंटर पदासाठी पात्रता- आयटीआय पेंटर व्यवसाय उत्तीर्ण(४ पदे), टर्नर पदासाठी पात्रता - आयटीआय टर्नर व्यवसाय उत्तीर्ण(२ पदे), वेल्डर पदासाठी पात्रता-आयटीआय वेल्डर व्यवसाय उत्तीर्ण(६ पदे), वायरमन पदासाठी पात्रता- आयटीआय वायरमन व्यवसाय उत्तीर्ण(३ पदे), मेकॅनिक रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग पदासाठी पात्रता- आयटीआय मेकॅनिक रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग व्यवसाय उत्तीर्ण(६ पदे). सर्व पदासाठी वयोमर्यादा १८ ते ३८ वर्ष राहिल.

**शिकाऊ उमेदवारांनी अर्ज करण्याचे आवाहन**



सन २०२५-२६ करीता राज्य परिवहन विभागातील विविध पदाकरीता उमेदवारांनी www.apprrenticeshipindia.org या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. संकेतस्थळावर दिलेल्या सुचनांप्रमाणे एमएसआरटीसी बुलढाणा विभाग (M.S.R.T.C. BULDANA DIVISION) या आस्थापनेकरीता ऑनलाईन अर्ज करावे. ऑनलाईन नोंदणी झालेल्या शिकाऊ उमेदवारांनी या कार्यालयाचा छापील नमुन्यातील अर्ज भरावे लागतील. सदर छापील अर्ज आस्थापना शाखा, राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, मलकापूर रोड, बुलडाणा येथे दि. १ ते १२ एप्रिल २०२५ पर्यंत सकाळी १० ते ३ या वेळेत उपलब्ध असतील. तसेच लगेच अर्ज स्विकारले जातील. अर्जाची किंमत १८ टक्के जीएसटीसह खुल्या प्रवर्गातील शिकाऊ उमेदवारांसाठी ५१० रुपये तर मागासवर्गीय शिकाऊ उमेदवारांसाठी २९५ रुपये आहे. उमेदवारांनी राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्टद्वारे M.S.R.T.C. FUND A/C BULDANA या नावाने काढून अर्जासोबत सर्व कागदपत्रासह या कार्यालयास दि. १२ एप्रिल २०२५ पर्यंत सायंकाळी ५ वाजेपर्यंत सादर करावे. संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी झालेल्या उमेदवारांना राज्य परिवहन महामंडळ बुलडाणा विभागामध्ये शिकाऊ उमेदवार म्हणून निवड करता येईल, याची नोंद घ्यावी.

## भेसळखोरांना रोखा

पनीर पासून तयार करण्यात आलेले डिशेस सर्वचजण चवीने खातात. लहान मुलांना तर पनीर खूपच आवडते. मात्र ह्याच सर्वांच्या आवडत्या पनीर मध्ये भेसळ होत असल्याची आणि राज्यभरात विकले जाणारे पनीर बनावट असल्याचा मुद्दा श्रीगोंद्याचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी विधानसभेत मांडला. राज्यात विकले जाणारे पनीर बनावट असल्याची चर्चा नागरिकांमध्ये होतीच आमदार साहेबांनी त्यावर शिक्कमोर्तब केले. बनावट पनीर तयार करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशी घोषणा उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांनी केली. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित या महत्वाच्या मुद्द्यावर चर्चा घडवून आणल्याबद्दल आमदार पाचपुते साहेब तसेच भेसळ खोरांवर कारवाई करण्याचे आश्र्वासन दिल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेब यांचे मनापासून आभार! बनावट पनीर तयार करून नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या या महाभागांना शिक्षा झाली पाहिजेच पण केवळ बनावट पनीर तयार करणारेच नव्हे तर सर्व भेसळखोरांवर कारवाई झाली पाहिजे. राज्यात भेसळ खोरांनी उच्छाद मांडला आहे . राज्यात दूध भेसळीचे प्रकार वाढत आहे. एक लिटर दुधात काही रासायनिक पदार्थ टाकून वीस लिटर दुध बनवण्याचे प्रकार सुरू आहे. मागील वर्षी अहिल्यानगर जिल्ह्यातच दूध भेसळीचे रॅकेट उघडकीस आले होते . दौंडमध्येही म्हशींनी अधिक दूध द्यावे यासाठी त्यांना प्रतिबंधक इंजेक्शन दिले जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. केवळ दुधातच नव्हे तर मिठाईमध्येही भेसळ केली जात आहे. मिठाई बनवताना वापरण्यात येणाऱ्या खव्यामध्येही भेसळ असल्याच्या अनेक घटना राज्यात उघडकीस आल्या आहेत. बर्फी किंवा खवा दुधापासूनच बनतो अशी सर्वसामान्यांची धारणा असते. फराळाचे पदार्थ बनवण्यासाठी त्याचा उपयोग केला जातो. लहान मुलांना हे खव्यापासून तयार केलेले पदार्थ खूप आवडतात. त्याला मागणीही जास्त असते त्यामुळेच वर्षानुवर्षे पडलेली दुधाची पावडर, स्टार्च, वनस्पती तूप, दूध याबरोबरच काही प्रमाणात रसायन मिसळून तयार केलेला निकृष्ट खवा भेसळखोर बाजारात खवपीत आहेत. काही भेसळखोर दर्जेदार खाद्यान्नाच्या ब्रॅण्डसशी साम्य असणारे बनावट, कमअस्सल तब्येतीला घातक पदार्थ सारख्याच दिसणाऱ्या वेष्टनातून विकत आहेत. हे पदार्थ शहरातील प्रश्र्नार्थक वातावरणात बनवले जातात. हे पदार्थ रस्त्यांवर कुत्री मांजरी फिरण्याच्या ठिकाणी वाळत घातलेले दिसतात. भेसळखोरांमुळे ग्राहकांचे आरोग्यच धोक्यात आले आहे. दुध, मिठाई आणि खाद्यपदार्थांत भेसळ होत असल्याने ग्राहकांना अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. भेसळयुक्त दुधामुळे ग्राहकांचे हृदय, किडनी व यकृत निकामी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. दुधातील भेसळीमुळे शरीर वाढीसाठी आवश्यक असणारे लायसीन हे अमिनो आम्ल शरीरास उपलब्ध होत नाही परिणामी लहान मुलांच्या शरीर वाढीवर परिणाम होऊन शरीराची वाढ खुंटते शिवाय उच्च रक्तदाब व हृदय विकारासारखे आजार जडतात. भेसळयुक्त पदार्थांचे सेवन केल्याने आगामी वीस वर्षात देशातील तीस ते चाळीस टक्के लोकांना कर्करोग होऊ शकतो असा इशाराच जागतिक आरोग्य संघटनेने दिला आहे. हे एक प्रकारचे स्लो पॉईजन आहे. हे स्लो पॉईजन देऊन ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणारे मोठे रॅकेट राज्यभरात कार्यरत आहे. या रॅकेटचा आणि त्यात सहभागी असलेल्या समाज कंटकांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करायला हवी. ही भेसळखोरी रोखण्याची जबाबदारी अन्न व औषध प्रशासनाची अर्थात एफ डी ए ची आहे. ते त्यांची जबाबदारी पार पाडतही आहे त्यामुळे अन्न व औषध प्रशासनाच्या नवी मुंबई परिमंडळ २ ला अलीकडेच नवी दिल्लीच्या ईट राईट इंडियाच्या उपक्रमात सहभागी होऊन २०२२ – २३ साठीचे पाच लाखांचे पारितोषिक अन्न सुरक्षा मानके प्राधिकरणाचकडून प्राप्त झाले आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदनच मात्र एफ डी आयच्या कारवाईत सातत्य नाही. कारवाईत सातत्य नसल्यानेच भेसळखोरांना त्यांची भीती वाटेनाशी झाली आहे. एफ डी आय चा वचक नसल्यानेच राज्यात भेसळखोरी वाढली आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. दूध आणि खाद्य पदार्थातील भेसळखोरी रोखण्यासाठी पोलीस आणि एफ डी ए ने एकत्र येऊन राज्यभरात धडक मोहीम राबवायला हवी. कमी श्रमात अधिक नफा मिळवण्यासाठी ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या भेसळखोरांना थेट फाशीचीच शिक्षा द्यायला हवी.

# कैलास नागरे यांची आत्महत्या नसून शासनाने बळी घेतला आहे : आमदार सिद्धार्थ खरात यांची शासनावर टीका

### ■ आत्महत्याग्रस्त नागरे कुटुंबीयास सांत्वनपर भेट ■ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांना ५ लाखांची मदत

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** देऊळगाव राजा तालुक्यातील शिवनी आरमारी येथील प्रगतशील शेतकरी तथा कृषी पुरस्कार प्राप्त युवा शेतकऱ्यांनी १४ गावातील पाण्याचा प्रश्र्न निकाली काढावा, या मागणीसाठी सतत पाठपुरावा केला.मात्र, याकडे शासनाने दुर्लक्ष केल्याने युवा शेतकरी कैलास नागरे यांनी हतबल होऊन आत्महत्या केली. ही आत्महत्या नसून शासनाने बळी घेतला आहे.अशी टीका आमदार सिद्धार्थ खरात यांनी आत्महत्याग्रस्त कैलास नागरे यांच्या कुटुंबीयास सांत्वनपर भेट दिल्यानंतर माध्यमांशी बोलताना केली.

त्याचबरोबर शिवसेना शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. शेतकऱ्यांसोबत ठामपणाने उभी आहे. त्यांचे प्रश्र्न मार्गी लावण्यासाठी आम्ही प्रयत्न करू, अशी असे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले. विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर आले होते. त्यांनी आमदार सिद्धार्थ खरात यांनी कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी कैलास नागरे यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी. माध्यमांशी बोलताना आमदार सिद्धार्थ




खरात म्हणाले की, संपूर्ण राज्यात होळी हा सण साजरा केला जात असताना शासनाचा कृषी पुरस्कार प्राप्त तथा प्रगतशील शेतकरी कैलास नागरे यांनी शासनाच्या अडेलतट्टू धोरणामुळे हतबलता आत्महत्या केली आहे. या संदर्भात मी शासनाकडे पाठपुरावा केलेला आहे.विधानसभेत प्रत्येक दिवशी प्रश्र्न उपस्थित करून आत्महत्याग्रस्त शेतकरी कैलास नागरे यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे व शासनाला त्यांचे तीनही मुले दत्तक घ्यावे लागण्यास भाग पाडले आहे. शासनाने आत्महत्याग्रस्त शेतकरी कैलास नागरे यांच्या पत्नीला नोकरी द्यावी, यासाठी पाठपुरावा केला आहे. याबाबत सीएमच्या मागे अक्षरशः धोसा लावलेला आहे.प्रकल्पातील पाणी संदर्भात प्रशासनातील अधिकाऱ्याने चुकीची माहिती दिली आहे.पाण्याचे आरक्षण बदलता येत नाही असे सांगितले आहे. मग सुरुवातीला पाच टक्के पाणी आरक्षणात होते, आता ते २४ टक्क्यावर गेले आहे.हे कसे असा प्रश्र्न त्यांनी उपस्थित करत शासन निष्ठूर आहे.त्याचप्रमाणे त्यांचे प्रशासन वागत आहे. असा आरोप त्यांनी केला.

यावेळी पत्रकारांनी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना नियमबाह्य पुनर्नियुक्ती दिली. यासंदर्भात आयुक्ताकडे तक्रारी सुद्धा करण्यात आल्या.असा प्रश्र्न उपस्थित केला असता आमदार सिद्धार्थ खरात यांनी जिल्हाधिकारी यांनी चुकीचे कामे करू नये आणि जिल्हाधिकारी करणार नाहीत .यासदर्भात अधिक माहिती घेऊन चौकशी केली जाईल असे सांगितले. त्याचबरोबर विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी नुकतेच कैलास नागरे यांच्या कुटुंबाला सांत्वनपर भेट दिली आहे. त्यांच्या समस्या मार्गी लावण्यासाठी शिवसेनेच्या वतीने पाठपुरावा केला जात आहे. शासन शेतकरी विरोधी वागत आहे. मात्र, शिवसेना शेतकऱ्यांसोबत आहे. शेतकऱ्यांच्या प्रत्येक प्रश्र्न सोडवण्यासाठी शिवसेना पूर्ण ताकतीने प्रयत्न करीत आहे. आत्महत्याग्रस्त शेतकरी कैलास नागरे यांचा प्रत्येक प्रश्र्न हा शिवसेनेच्या वतीने आमदार या नात्याने संपूर्ण अधिवेशनात मांडला आहे. त्याचबरोबर सोयाबीनचा प्रश्र्नही अधिवेशनात मांडला आहे. त्यामुळे विधान सभेला व संपूर्ण महाराष्ट्राला शेतकरी आत्महत्या व सोयाबीन संदर्भात माहिती झाली आहे.शासन शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडत असले तरी, शिवसेना शेतकऱ्यांच्या पाठिशी आहे. शेतकऱ्यांचा प्रत्येक प्रश्र्न मार्गी लावण्यासाठी ठामपणे आम्ही लढत राहू असे, मत यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांना ५ लाखांची मदत शिवणी, अरमाळ या गावातील आदर्श शेतकरी पुरस्कार प्राप्त शेतकरी कैलास नागरे यांनी खडकपूर्णा धरणातील डाव्या कालव्याद्वारे पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळावे, या मागणीसाठी काही दिवसांपूर्वी दिलेले आत्मबलिदान व्यर्थ जाणार नसल्याची ग्वाही विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दिली. शिवसेना – उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना मुलांच्या शिक्षण व संगोपनासाठी ५ लाख रुपयांची मदत करण्यात आली.

## अभियांत्रिक व वैद्यकीय प्रवेश परीक्षांसाठी अर्ज आमंत्रित; अनुसूचित जमातीच्या ४० विद्यार्थ्यांची चाळणी परिक्षेव्दारे होणार निवड

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** आदिवासी विकास विभागातंर्गत बुलढाणा जिल्ह्यातील इयत्ता दहावी व बारावी मध्ये शिकत असलेल्या अनुसूचित जमाती विद्यार्थ्यांकडून अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश(छएएढ, उएढ/गएए) परीक्षेच्या तयारीकरीता अर्ज मागविण्यात आले आहे. प्रत्येकी ४० विद्यार्थ्यांची चाळणी परिक्षेद्वारे निवड केली जाणार आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी दि. ९ एप्रिल २०२५ पर्यंत अर्ज करावे, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी मोहनकुमार ग.व्यवहारे यांनी केले.

सर्व शासनमान्यता प्राप्त शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित शाळा, आदिवासी विकास विभागातंर्गत असलेल्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, इएमआरएस शाळेच्या मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेतील मार्च २०२५ मध्ये इयत्ता १० वीची परिक्षा दिलेल्या व शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये इयत्ता ९ वी मधिल गुणानुक्रमे प्रथम पाच मुले व पाच मुली यांचे आवेदनपत्र प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, न्यू. राधिकिसन प्लॉट, महसूल भवन अकोला येथे दि. ९ एप्रिलपर्यंत सादर करावयाचे आहे. सदर आवेदनपत्र जिल्हा परिषद, शिक्षणाधिकारी, (माध्यमिक), शासकीय, अनुदानित आदिवासी आश्रमशाळांमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी चाळणी परिक्षेमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## राज्य ग्राहक हेल्पलाईन 'राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाईन' मध्ये विलीन

### राज्यातील सर्व ग्राहकांनी १ एप्रिल २०२५ पासून आपल्या समस्या व तक्रारी मांडण्याच्या सूचना

**मुंबई/प्रतिनिधी :** अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे 'राज्य ग्राहक हेल्पलाईन' हे ३१ मार्च २०२५ रोजी मध्यान्हानंतर बरखास्त करून 'राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाईन' मध्ये विलीन करण्यात येत आहे. या हेल्पलाइनकडे राज्यातील सर्व ग्राहकांनी १ एप्रिल २०२५ पासून आपल्या समस्या व तक्रारी मांडाव्यात, अशी जाहीर सूचना कक्ष अधिकारी ईशा पवार यांनी प्रसिद्धी पत्रकार दिली आहे.

राज्यात कंझ्युमर गाईडन्स सोसायटी ऑफ इंडिया, मुंबई या संस्थेच्या मदतीने राज्य ग्राहक हेल्पलाईन ची २१ ऑक्टोबर २०१० च्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आली होती. उपभोक्ता मामले विभाग, भारत सरकार यांच्या सुचनेनुसार, २६ मार्च २०२५ रोजीच्या शासननिर्णय क्र. संकिर्ण-२०२५/प्र.क्र१०/ग्रासं-२ अन्वये राज्य ग्राहक हेल्पलाईन ही ३१ मार्च २०२५ मध्यान्हानंतर पासून बरखास्त करुन राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाईन मध्ये विलिन करण्यात आली आहे. तरी, राज्यातील सर्व ग्राहकांस विनंती आहे की, १ एप्रिल, २०२५ पासून सर्व ग्राहकांनी आपल्या समस्या व तक्रारी राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाईन कडे मांडाव्यात.

याकरीता पुढील माध्यमांचा वापर करावा. ई-मेल आय डीः nch-cagov.in, टोल फ्री क्रमांकः १८००११४००० किंवा १९१५ (सार्वजनिक सुट्टया सोडुन इतर सर्व दिवशी -सकाळी ०८:०० ते रात्री ०८:००), https://consumerhelpline.gov.in/user/signup.php या वेब पोर्टलद्वारे, एसएमएस तसेच व्हाट्सअपद्वारे ८८०००१९१५ या क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच NCH APP द्वारे, ग्राहक UMANG APP द्वारे आपल्या तक्रारींची नोंद करु शकतात, असेही प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.




# कंगना राणौतला तिचे वडील डॉक्टर बनवू इच्छित होते, ती बनली बॉलिवूडची क्वीन

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडची स्पष्टवक्ता अभिनेत्री आणि राजकारणी कंगना राणौत २३मार्च रोजी तिचा वाढदिवस साजरा करत आहे. कंगना तिच्या स्पष्टवक्त्यांमुळे अनेकदा वादात सापडते. आपल्या अभिनयासाठी ४ राष्ट्रीय पुरस्कार, ५ फिल्मफेअर पुरस्कार आणि पद्मश्री जिंकणारी बॉलिवूडची ही 'क्वीन' तिच्या कारकिर्दीच्या सुरुवातीपासूनच बॉलिवूडमधील दिग्गजांशी सामना करत आहे.

हिमाचल प्रदेशातील मंडी जिल्ह्यातील भांबला या छोट्याशा गावात जन्मलेली कंगना एका रूढीवादी संयुक्त कुटुंबात वाढली. त्यांची आई आशा राणौत शाळेत शिक्षिका होत्या आणि वडील अमरदीप राणौत यांचा स्वतःचा व्यवसाय होता. कंगनाला मोठी बहीण रंगोली आणि धाकटा भाऊ अक्षत आहे. रंगोली गेल्या अनेक वर्षांपासून बॉलिवूडमध्ये कंगनाच्या सोबत आहे आणि बऱ्याच वेळा कंगनाच्या टिप्पण्यांवर येणाऱ्या कठोर प्रतिक्रियांना तीच प्रतिसाद देते.

बंडखोर स्वभावाच्या कंगनाला कधीही चुकीच्या मार्गावर चालणे आवडले नाही. तिच्या लहानपणी, जेव्हा तिच्या धाकट्या भावाला खेळण्यासारखी बंदूक देण्यात आली आणि तिला बाहुली देण्यात आली, तेव्हा तिने ती घेण्यास नकार दिलाच पण या भेदभावाचा तीव्र निषेधही केला. त्याला त्याच्या आवडीचे कपडे घालणे आणि स्वतःच्या इच्छेनुसार जीवन जगणे आवडत असे.

कंगनाने चित्रपटसृष्टीत असतानाही निषेधाचा हा गुण कायम ठेवला आणि सर्व प्रकारच्या भेदभावाविरुद्ध ती उभी राहताना दिसली. तिच्या पुरुष सहकलाकारांपेक्षा कमी मानधन मिळण्याचा मुद्दा असो, चशढे वाद असो किंवा चित्रपटसृष्टीतील घराणेशाहीचा मुद्दा असो, कंगनाने नेहमीच तिचा मुद्दा ठामपणे मांडला आहे आणि त्यावर ठाम राहिली आहे.

कंगनाच्या कुटुंबाची इच्छा होती की तिने डॉक्टर व्हावे आणि हेच लक्षात घेऊन ती चंदीगडच्या डीएव्ही स्कूलमध्ये विज्ञानाचे शिक्षण घेत होती, पण अचानक एके दिवशी तिला वाटले की ती यासाठी तयार केलेली नाही आणि वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी ती दिल्लीला गेली. कंगनाच्या वडिलांना हे पाऊल अजिबात आवडले नाही आणि त्यांनी आपल्या मुलीशी असलेले सर्व संबंध तोडले.

दिल्लीत काही काळ मॉडेलिंग केल्यानंतर, कंगना अभिनयाकडे वळली आणि अस्मिता थिएटर ग्रुपमध्ये सामील झाली. या काळात त्यांनी काही नाटकांमध्ये काम केले आणि त्यांच्या अभिनयाचे खूप कौतुक झाले. येथे तिच्या अभिनय कौशल्याची चाचणी घेतल्यानंतर, कंगना स्वप्नांच्या शहरात, मुंबईत पोहोचली आणि आशा चंद्राच्या नाट्य शाळेत चार महिन्यांचा कोर्स केल्यानंतर, ती तिच्या स्वप्नांच्या जगात पोहोचण्याचा मार्ग शोधू लागली.

२००४ मध्ये, कंगनाला अनुराग बसूच्या दिग्दर्शनाखाली 'गँगस्टर' चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली आणि १७ वर्षांच्या या मुलीने तिच्या परिपक्व अभिनयाने तिचा भविष्यातील मार्ग सुकर केला. यानंतरही कंगनाने अनेक चित्रपटांमध्ये काम केले आणि हळूहळू ती चित्रपट जगताचा भाग बनली.

२००८मध्ये प्रदर्शित झालेल्या 'फॅशन' चित्रपटाने कंगनाला सातव्या आसमानात नेले. फॅशन आणि मॉडेलिंगच्या दुनियेची काळी बाजू दाखवणाऱ्या या चित्रपटात कंगनाने मॉडेल शोनाली गुजरालची भूमिका अशा प्रकारे साकारली होती की तिला त्यासाठी राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या काळात कंगनाला यश मिळत होते, पण ती त्याच प्रकारच्या भूमिकांमध्ये अडकत होती. २०११ मध्ये आलेल्या 'तनु वेड्स मनु' या चित्रपटाने त्याला या बंधनातून मुक्त केले. आर. कंगनाच्या माधवनसोबतच्या चित्रपटाने हे सिद्ध केले की ती सर्व प्रकारच्या भूमिका पूर्ण आत्मविश्वासाने साकारू शकते.

२०१४ मध्ये आलेल्या 'क्वीन' चित्रपटात कंगनाने एका मुलीची भूमिका साकारली होती जिचा मंगेतर लग्नाच्या अगदी आधी तिला सोडून जातो आणि ती दुःखी मनाने आणि हातात मेहंदी घेऊन एकटीच तिच्या हनिमूनला जाते. या चित्रपटातील कंगनाच्या उत्कृष्ट अभिनयामुळे तिला केवळ राष्ट्रीय पुरस्कार मिळाला नाही तर ती बॉलिवूडची खरी राणीही बनली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### उद्धव ठाकरे हे आधुनिक जगातले औरंगजेब आहेत नरेश म्हस्के यांची टिका



दिल्ली: उद्धव ठाकरे हे आधुनिक जगातले औरंगजेब आहेत.बाळासाहेबांना शेवटच्या दिवसांत त्यांनी किती त्रास दिला हे सगळ्यांना माहित आहे. राज ठाकरे त्याबाबत अनेकदा बोलले आहेत.औरंगजेबाने सत्तेसाठी आपल्या भावांचा काटा काढला. उध्दव ठाकरे यांनी वेगळं काय केलं ?आपल्या सख्ख्या भावांना त्यांनी पद्धतशीरपणे दूर केले आहे. बाळासाहेबांची वैचारिक संपत्ती त्यांनी सोडली. पण इतर प्रॉपर्टीसाठी भावासोबत दावा मांडला. हा दावा कोर्टात गेला.बाळासाहेबांना अखेरच्या दिवसांत त्यांनी त्रास दिलाच. पण त्यांच्या निधनानंतर शिवसेनेच्या दुश्मनांशी हातमिळवणी करून आताही यातना देत आहेत. जे भावाचे नाही झाले, ते जनतेचे काय होणार? अशी टीका नरेश मस्के यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली.

### अपहरण झालेल्या तीन वर्षीय चिमुकलीचा आढळला मृतदेह; शेजारच्या इसमानेच केला मुलीचा खून




दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** अपहरण झालेल्या तीन वर्षीय चिमुकलीचा आढळला मृतदेह आढळला. सदर घटना तळोजा मध्ये आज उघडकीस आली. शेजारच्या इसमानेच केला मुलीचा खून केला असून तळोजा पोलिसांनी २४ तासात आरोपीला ताब्यात घेतले आहे.अशी माहिती पोलीस आयुक्त प्रशांत मोहिते यांनी माध्यमांशी बोलताना दिली व. माहिती देताना पोलीस आयुक्तांनी सांगितले की, शेजारच्या भांडणांमध्ये चिमुकलीचा गेला बळी घेतला असून नराधमाने आधी मुलीचा गळा आवळला. नंतर सुटकेसमध्ये टाकून मृत मुलीच्या बॉडी आई वडिलांच्या घरात लपवली. तळोजा देवीचा पाडा येथे राहणारी तीन वर्षीय मुलीचा सुटकेसमध्ये मृतदेह तळोजा पोलिसांना मिळाला असून हर्षीका अमरिश शर्मा असं मुलीचे नाव आहे.अपहरण केल्याचा गुन्हा तळोजा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला. त्यानंतर पोलिसांनी या मुलीचा शोध सुरू केल्यानंतर आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.अशी माहिती पोलीस आयुक्त प्रशांत मोहिते यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

### येवला बालाजी मेटल या होलसेल भांड्याच्या दुकानात धाडसी चोरी, तब्बल 30 ते ३५ लाखांची तांब्या पितळाची भांडी चोरी







दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** येवला शहरात गेल्या अनेक दिवसांपासून भुरट्या चोरांनी नागरिक आधीच हवालदिल झाले होते. गेल्या काही दिवसांपूर्वी एस एस मोबाईल या दुकानाचे शटर तोडून दुकानातील लाखोंचा ऐवज चोरून नेण्यात आला होता या घटनेचा तपास अद्याप लागलेला नसताना शेजारीच असलेल्या बालाजी मेटल होलसेल भांड्यांच्या दुकानातून तांब्या पितळाची तब्बल ३० ते ३५ लाख रुपयांची भांडी चोरून नेण्यात आली असून या घटनेने तालुक्यात खळबळ उडाली आहे. चोरट्यांनी एवढी धाडसी चोरी करून पोलिसांना आव्हान दिले असून आता तरी येवल्यातील पोलिसांची संख्या वाढून पोलिसांची गस्त वाढवावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# अधिवेशनाच्या चार आठवड्यामध्ये आम्ही दररोज नऊ तास काम केलं

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी : कोल्हापुरातील विविध विकास कामासंदर्भात आज बैठक घेतली आहे.डीव्ही कारसाठी मागच्या वेळी सांगण्यात आले होते. आता ५ वाहन मागितली आहेत.अधिवेशनाच्या चार आठवड्यामध्ये आम्ही दररोज नऊ तास काम केले, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली.**

यावेळी ते पुढे म्हणाले की, कोणी काय म्हणावे हा ज्याचा त्याचा अधिकार आहे. ही लोकशाही आहे. संविधानावर चर्चेनंतर ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनीही अभिनंदन केले.इतक सुंदर भाषण मुख्यमंत्र्यांनी केले. अधिवेशनाच्या चार आठवड्यामध्ये आम्ही दररोज नऊ तास काम केले. यामुळे अनेक लक्षवेधी व प्रश्न मार्गी लागले आहेत. विरोधकांकडे कोणताच मुद्दा आता राहिलेला नाही. त्यामुळे ते वेगळे काही तरी मुद्दे काढत आहेत. विरोधक नुसते विधिमंडळाच्या पायऱ्यावर बसून दहा-पंधरा मिनिटे घोषणा द्यायचे आणि सभागृहात येऊन बसायचे असा उद्योग सुरू आहे. मिडियाच्या माध्यमातून जनतेला आम्ही फार काही काम करत असल्याचा केविलवाणा प्रयत्न त्यांनी केला आहे. सभागृहात विरोधकांची उपस्थिती जास्त नव्हती, फार कमी लोक उपस्थिती रहायचे. जे कामकाज आम्ही हाती घेतले होते, हे व्यवस्थित पार पडलेले आहे. आमच्याकडे पूर्ण बहुमत असतानाही रेटून नेण्याचा प्रयत्न आम्ही केलेला नाही.संतोष देशमुख हत्याप्रकरणी एसआयटीमार्फत चौकशी सुरू आहे. कुठेही राजकीय हस्तक्षेप नाही. उज्वल निकम यांच्यासारखे प्रख्यात वकील तिथे नेमले गेले आहेत. इथे कोणाला पाठिशी घालण्याचा प्रश्न येत नाही. जो चुकीचा वागला असेल जो दोषी असेल जो मास्टरमाईंड असेल त्याला तेथे शासन होणारच आहे. कोल्हापूर हद्दवाढ संदर्भात नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे,





पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह लोकप्रतिनिधी सोबत चर्चा केली आहे.या भागातील लोकप्रतिनिधींचा देखील ऐकून घ्यावा लागते. त्या बैठकीत बरेच अंशी मार्ग निघेल, अशी चर्चा झाली आहे. सौगात-ए-मोदी चांगला काही कार्यक्रम आणला. तर त्यात वाईट वाटून घ्यायचं काय? ,सर्वधर्मसमभाव हे आपल्या देशाचे परंपरा आहे. त्यामुळे हा एक महत्त्वाचा घटक आहे.ज्या पद्धतीने इतर सण असतात. त्या पद्धतीने रमजान महिना देखील महत्त्वाचा असतो. त्यानिमित्त काही घटकाला शुभेच्छा देण्याकरता हा कार्यक्रम आणला आहे. प्रशांत कोरटकरने गुन्हा कबूल केला असल्यास कागदपत्र तयार करून व्यवस्थेसमोर मांडले जातील. अजूनही कोणी दोषी असेल त्यांनाही शासन केले जणार आहे. कोणताही पुरावा न देता बातम्या पसरवल्या जातात आणि त्याला काही अर्थ नसतो. कर्जमाफी निर्णयामुळे कर्नाटक सरकारची परिस्थिती आज काय झाली आहे पाहत आहे का? केरळला कोर्टात जाऊन अधिकच कर्ज मागावे लागले आहे.आम्ही राज्याची आर्थिक स्थिती विस्कटणार नाही. राज्याच हित साधेल असा विचारपूर्वक अर्थसंकल्प सादर केला. राज्यातील सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न आम्ही अर्थसंकल्पातून केला. निवडणुकीपूर्वी आम्ही काही गोष्टी सांगितल्या होत्या. त्यातील लाडकी बहीण आणि वीज कर्जमाफीची योजना चालू ठेवली आहे. आमची आर्थिक परिस्थिती बघत सर्व योजना करणार आहोत.आम्ही दिलेल्या शब्दापासून बाजूला गेलो नाही. पाच वर्षासाठी जी आश्र्वासन दिली, ती पुढील पाच वर्षात टप्प्याटप्प्याने पूर्ण करू,असे मत यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले.

## संगमनेरमध्ये २२ पोलिस कर्मच्याऱ्यांना घेऊन जाणाऱ्या वाहनाचा अपघात

दैनिक आपला विदर्भ

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** संगमनेरमध्ये २२ पोलिस कर्मच्याऱ्यांना घेऊन जाणाऱ्या वाहनाचा अपघात झाला आहे. अपघातग्रस्त वाहनात हडपसर पोलीस स्टेशनचे २२ कर्मचारी होते सर्वच्या सर्व २२ पोलिस कर्मच्यारी सुरक्षित असुन सुदैवाने कोणतीही जीवीत हानी झाली नाहीये. फोर्स फाटा घेऊ पुण्यावरून मालेगावच्या दिशेने ह पथक निघाले होते. संगमनेरच्या तळेगाव शिवारातील हा प्रकार आहे. काँग्रेस कार्यकर्त्यांनी अपघात स्थळावर मदत केली आहे.



## गळ्यात नोटांचा हार घालून महिला सरपंचाचे नांदेडच्या जिल्हा परिषद कार्यालयासमोर आंदोलन





दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** जिल्हा परिषद कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतीमध्ये कुठलेही काम होत नसल्याने अखेर महिला सरपंचाने चक्क गळ्यात नोटाचे बंडल घालून जिल्हा परिषद कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू केलं आहे. पैसे दिल्याशिवाय कुठलंही काम जिल्हा परिषद कार्यालयातील अधिकारी करीत नाहीत असा आरोप या महिला सरपंचाचा आहे. नांदेड तालुक्यातील इंजेगाव येथील मुक्ताई पंचलिंगे असं या आंदोलन करणाऱ्या महिलेचे नाव आहे.



या महिला सरपंचाने अनेक वेळा जिल्हा परिषद कार्यालयामध्ये विविध मागण्यांसाठी निवेदन दिली. परंतु, त्या मागण्यांकडे जिल्हा परिषद प्रशासनाने साफ दुर्लक्ष केल्याचा आरोप या महिला सरपंचांनी केला आहे. नांदेड पंचायत समितीसाठी कायमस्वरूपी गट विकास अधिकारी मिळत नाहीये. गावात स्मशानभूमी नाहीये, अंगणवाडीसाठी इमारत देखील नाहीये अशा विविध समस्या गावांमध्ये आहेत. जिल्हा परिषद कार्यालय मात्र या समस्यांकडं दुर्लक्ष करत असल्याने अखेर या महिला सरपंचांनी जिल्हा परिषद कार्यालयासमोर धरणे सुरू केले आहे.

## महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात अन्न भेसळ संदर्भात कार्यशाळा; प्रात्यक्षिकाव्दारे तज्ज्ञांचे मार्गदर्शन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** अन्न पदार्थामधील भेसळ ओळखण्याबाबत जनजागृती व्हावी यासाठी येथील महात्मा फुले विद्यालयात दि. २४ मार्च २०२५ रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अन्न पदार्थातील भेसळ कसे ओळखावे याबाबत तज्ज्ञांव्दारे प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून जनजागृती केली.

दैनंदिन जीवनातील अन्नपदार्थांमध्ये वेगवेगळे अपायकारक पदार्थाची भेसळ होत आहे. या अन्नपदार्थातील भेसळीला घरच्या घरी तपासायचे आणि भेसळ आहे, की नाही हे ठरवायचे कसे यासाठीची जागृती करण्यासाठी फुड सेप्टी ऑन व्हील या फिरती अन्न व औषधी प्रशासन प्रयोगशाळा छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. सादरीकरणासाठी छत्रपती संभाजीनगरहून आलेले अन्न व औषध विश्र्लेषण रसायनशास्त्रज्ञ सत्यवान बादाडे यांनी प्रात्यक्षिकसह अन्न भेसळ ओळखयची कशी याविषयींचे सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी पनीर, खवा, हळद, लाल मिरची पावडर, डाळी यामध्ये होणाऱ्या भेसळी आणि त्या भेसळी वेगवेगळ्या रसायनाच्या माध्यमातून कशा ओळखायच्या याचे प्रात्यक्षिकाद्वारे सादरीकरण केले. विषारी घटकांचे अनेक खाद्यपदार्थात भेसळ होत असल्याने विद्यार्थ्यांनी दर्जाहीन, रस्त्यावरील उघडे खाद्यपदार्थ, शीतपेय, रंगबिरंगी मिठाई खाण्याचे टाळावे, असे आवाहन श्री. बादाडे यांनी केले.

अन् व औषध प्रशासन कार्यालयाचे सहायक आयुक्त प्रमोद पाटील यांनी विद्यार्थी व त्यांच्या घरातील कोणी गुटखा, पानमसाला, सिगारेट, तंबाखु इ. निकोटीन युक्त पदार्थ सेवन करत असतील तर त्यांना या वाईट सवयी सोडण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रवृत्त करावे, असेही आवाहन केले. तसेच नेहमी दर्जेदार पदार्थांचीच निवड करावी. भेसळ करणाऱ्या खाद्यपदार्थ विक्रेत्याविरुद्ध रीतसर तक्रार नोंदविण्याचे आवाहन यावेळी केले.

कार्यक्रमाचे प्रास्तविक व संचलन जेष्ठ शिक्षक नरेश पेदये यांनी केले. तर आभार प्रदर्शन शिक्षीका सुचीता सातव यांनी केले. यावेळी अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त प्रमोद पाटील, सहायक आयुक्त (औषधे) गजानन घिरके, मुख्याध्यापीका श्रीमती स्नेहलता मानकर, वरिष्ठ लिपीक श्रीकांत मोरे, महात्मा फुले मंडळाचे अध्यक्ष प्रकाश वानेरे, सचिव बाळासाहेब चौधरी तसेच शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षीका, विद्यार्थी, विद्यार्थीनी, कर्मचारी उपस्थित होते.

# बीड जिल्ह्यातील २७५९ बेकायदेशीर जन्म प्रमाणपत्र रद्द

### किरीट सोमय्या यांची माध्यमांशी बोलताना माहिती

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** जिल्ह्यात १० हजारहून अधिक अर्ज जन्म प्रमाणपत्राचे आले आहेत. त्या जन्म प्रमाणपत्रापैकी १० हजार ८४५ जणांना उशिराची जन्म प्रमाणपत्र दिले गेले, त्यातील २७५९






बेकायदेशीर देण्यात आले होते ते रद्द करण्यात आले आहे. अशी माहिती भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, ज्यांच्याकडे भारतातील कोणताही पुरावा नाही, अशा प्रकारचे लोक मुस्लिम बांगलादेशी आहेत. काहींनी पुरावा म्हणून आधार कार्ड, पॅन कार्ड आणि राशन कार्ड दिले आहेत. दिलेल्या सर्व अर्जाची पुर्नर तपासणी करण्याचे जिल्हाधिकारी आणि पोलिसांनी मान्य केले आहे. पुढील पंधरा दिवसात बीड जिल्ह्यात खोटे पुरावे, बनावट कागदपत्र, अशा ठिकाणी गुन्हा दाखल होणार आहे. ६२ वर्षांपूर्वी जन्मलेल्या माणसाने आधार कार्ड म्हणून दिलेला पुरावा ग्राह्य धरला जात नाही. असे बनावट पुरावे ज्या तहसीलदारने दिले आहेत. त्या तहसीलदारच काय करायचे हा निर्णय जिल्हाधिकारी घेणार आहेत. जे अपात्र बेकायदेशीर प्रमाणपत्र मिळवले जे इथले नाही, त्यांच्याकडे भारतीय असल्याचा एकही कागदपत्र नाही, ते पाकिस्तानी, बांगलादेशी, रोहिया, अफगाणी आहेत त्यांना इथे राहण्याचा अधिकारी नाही.मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे धन्यवाद मानतो, कारण नोव्हेंबर २०२३ मध्ये या कायद्यात कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार देण्यात आले.लोकसभा पराभवानंतर जास्त प्रमाणात अर्ज आले. अशी माहिती भाजप नेते किरीट सोमय्या यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

विविध वृत्त...

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वागतासाठी नागपूर नगरी सज्ज; चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ



**नागपूर/प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दौरा मार्चला होणार आहे. संख्या मुख्यालय, दीक्षाभूमी त्यानंतर माधव नेत्रालय आणि डिफेन्स चे दारुगोळा निर्माण करणारी सोलार कंपनीला ते भेट देणार आहेत. भाजपकडून प्रत्येक चौकात मोदींचे स्वागत केले जाणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या स्वागतासाठी नागपूर नगरी सज्ज झाली आहे. अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.



यावेळी बोलताना बावनकुळे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी रमजान ईदच्या शुभेच्छा सर्व देश वासीयांना दिल्या आहेत. भाजपच्या मायनॉरिटी कमिटीने रमजानच्या निमित्ताने तो कार्यक्रम राबवला आहे. भाजपचे अनेक अल्पसंख्यांक मुस्लिम मोर्चा यांच्या माध्यमातून हा कार्यक्रम राबवला जात आहे. आम्ही मुस्लिम विरोधी लोक नाही आहोत.भारतात राहुन पाकिस्तानचा झेंडा घेऊन फिरणारे लोकांच्या विरोधात आहे. उद्धव ठाकरेंच्या नाशिक आणि परभणीच्या रॅलीत पाकिस्तानचे झेंडे फडकत होते. त्यांच्या विरोधी आमची भूमिका आहे. पाकिस्तान मॅच जिंकल्यानंतर भारतात राहून फटाके फोडणारे जे लोक आहेत, त्यांच्या विरोधात आहोत. सर्व मुस्लिम विरोधी आम्ही नाही. या देशाच रक्तच असं आहे की, सर्वांना सोबत घेऊन आम्ही जातो. अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

## उष्णतेच्या लाटेमध्ये पिकांचे व्यवस्थापन; कृषि विभागामार्फत उपाययोजना जाहिर

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा /प्रतिनिधी :** उन्हाळाच्या कालावधीत उष्माघात व उष्णतेच्या लाटेमुळे पिकांचे नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे पिकांचे नुकसान टाळण्यासाठी पिक व्यवस्थापन करणे अत्यंत महत्वाचे आहे. त्याअनुषंगाने कृषि विभागामार्फत उपाययोजनसबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केले आहे. या मार्गदर्शक सूचनाचे शेतकऱ्यांनी अवलंब करावे, असे आवाहन जिलहा अधिक्षक कृषि कार्यालयाचे कृषि उपसंचालक अनुराधा गावडे यांनी केले आहे.

**कृषि विभागाने निर्गमित उपाययोजना :** उन्हाळ्यातील भूजल पातळी खालावते म्हणून शेतकऱ्यांनी पिकांना ओलीत करतेवेळी पाण्याचा अपव्यय होणार नाही अशा पध्दतीने पाणी द्यावे. फळबाग, भाजीपाला या पिकांना ओलीत करताना प्राधान्याने ठिबक किंवा तुषार सिंचन पध्दतीचा वापर करावा. ज्यामुळे पाण्याची बचत होण्यास मदत होईल. पिकांना सिंचनासाठी आवश्यक तितक्याच पाण्याचा वापर करावा, कारण उन्हाळ्यात भूजल पातळी खालावलेली असते. सध्याच्या हवामान परिस्थितीत पिकाला पाण्याचा ताण बसू नये, म्हणून ४ ते ५ दिवसांच्या अंतराने ओलीत करावे. कोरडे हवामान, उच्च तापमान लक्षात घेता सुर्यफुल पिकाला वाढीच्या अवस्थेत पाण्याचा ताण बसल्यास उत्पादनात लक्षणीय घट येऊ शकते. म्हणून पिकाला ४ ते ५ दिवसांच्या अंतराने ओलीत करावे.

कमाल तापमान ३७ अंश सेल्सिअसच्यावर गेल्यास लिंबू झाडांची वाढ कमी व्हायला सुरुवात होते. त्यामुळे ठिबक सिंचनाने ४ ते ५ दिवसांच्या अंतराने लिंबू बागेला ओलीत करावे. उष्णतामानाचा केळी बागेवर विपरीत परिणाम होऊ नये म्हणून बाष्पीभवन रोखण्यासाठी केओलीन बाष्परोधक ८० ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात २० ते ३० दिवसांच्या अंतराने दोन ते तीन वेळा फवारावे. सध्याच्या वाढत्या तापमानामुळे परिपक्व झालेली वांगीची प्रत खराब होऊ शकते. म्हणून शक्यतो ताबडतोब परिपक्व वांगी काढून त्याची प्रतवारी करावी व ती वांगी बाजारपेठेत विक्रीस पाठवण्याची व्यवस्था करावी. उन्हाळ्यातील ३७ओ अंश सेल्सिअस पेक्षा जास्त असलेले कमाल तापमान व कमी झालेली आर्द्र पेरू फळबागेतील फळधारणा योग्य रीतीने होण्यास बाधक ठरते व त्यामुळे फळगळ होऊन एकंदरीत उत्पादनात घट येऊ शकते. म्हणून उच्च तापमानापासून संरक्षण म्हणून फळबागेत सेंद्रिय आच्छादनांचा वापर करावा. वाढत्या तापमानाची कक्षा लक्षात घेऊन कांदा पिकाला ४ ते ५ दिवसांच्या अंतराने ओलीत करावे तसेच ओलीत करतेवेळी ते प्राधान्याने सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळेत करावे.

पिकांच्या व्यवस्थापनाकरीता तसेच उष्णतेच्या लाटेपासून होणारे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी भारतीय हवामान विभागाच्या वेबसाईट https://mausam.imd.gov.in वर हवामानाविषयी अद्यावत माहिती घेत राहावी, असे आवाहन कृषि विभागाने केले आहे.

# नियतीने बापाचे छत्र हिरावले अन् जगण्याने बालपणातच छळले

## अनाथ लेकरांचा जगण्यासाठी आर्त टाहो

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी : जीवनात सुखदु:ख येणारच सुखात हसायचे अन् दुखत संकटाला दोन हात करायचे असे जीवन गाणे आहे. मात्र , खेळण्या बागडण्याच्या वयाला नियतीची दृष्ट नजर लागली अन् सगळं आनंद हिरावून घेतला. संकटाची ढाल असलेल्या अन् क्षणा क्षणाला स्मितहास्य देऊन आनंद फुलवणाऱ्या बापाची छत्रछाया नियतीने हिरावून घेतल्याने चार चिमुकल्या मुलींवर संकटाचा डोंगर कोसळला आहे. नियतीने जगण्याची एवढेही सजा देत आयुष्याची थट्टा मांडल्याने हतबल झालेल्या वृद्धमातेची व चिमुकल्या चिमण्या जगण्यासाठी अर्थ टाहो पडत आहेत. एखाद्या दानशुरांनी यावे आणि या चिमुकल्यांना जगण्याचा आधार द्यावा, अशी अपेक्षा त्या वृद्ध मातेसह चिमुकल्यांनाच नव्हे तर, हे दृश्य पाहणाऱ्या प्रत्येकाच्या मनात येत जीवाची घालमेल करून जात आहे.**



तालुक्यातील शेगाव कचोरीसाठी प्रसिद्ध असलेले बोथा हे बुलढाणा जिल्ह्यातील ५००-५५० लोकवस्तीचे गाव आहे.या गावाच्या प्राथमिक शाळेला लागून असलेल्या छोट्याश्या खुराड्यागत,जिथं जनावरही राहायला नकार देतील अश्या एका सार्वजनिक जागेत तब्बल ७५ वर्ष वय असलेली शोभा उत्तम भालेराव ही आजी जिला सरळ चालणे शक्य नाही, ती कु. गौरी आकाश भालेराव वय अडीच, कु. संजीवनी आकाश भालेराव वय -५, कु. पायल आकाश भालेराव वय -९ तर, कु. ज्योती आकाश भालेराव वय -११ या चार नातींना घेऊन, म्हातारी आजी त्यांचा सांभाळ करत आहे. मुलींच्या बापाचे अपघाती निधन झाले असून, मुलीच्या जन्मदात्या आईने मुलींना आजीजवळ सोडून दुसरे लग्न केले आहे. या चारही मुली इतक्या दुर्दैवी आहे, की त्यांना आई- वडिलांचा सहवास ही नाही आणि डोक्यावर हक्काचं छप्पर ही नाही. पावसाळ्यात घरे झाकावे की अंग काहीच कळत नाही.आजही ती आजी या चार ही मुलींना घेऊन गोठा सदृश्य जागेत राहते आणि ही जागा सरकारी आहे. गोठा तरी बरा असतो अशी ती जागा आहे.भिंती, छप्पर केव्हा अंगावर पडेल याची शाश्र्वती नाही. मरणासन्न यातना चिमुकल्या आज अनुभवत आहेत. आजीच्या गोष्टीतला कोणीतरी देवदूत येईल आणि आपले जगणे माणसासारखे होईल या प्रतीक्षेत त्या चिमुकल्या आहेत. वृद्धापकाळमुळे आजीच्याने आता कोणतेच काम होत नाही. आजी गावातून खायला काही मागून आणते आणि त्यावर ही लेकरं जगतात. छोट्या लहान दोन मुलींची पोट भरली, की मग मोठ्या मुली काहीतरी खातात.त्यातील दोन मुली गावातील जिल्हा परिषद शाळेत चौथा वर्ग मध्ये शिकत आहेत.३ वर्षा पूर्वी याचं शाळेतील संवेदनशील शिक्षकांनी या दोन मुलींना बालसंगोपन योजनेचा लाभ मिळवून दिला होता. अमित शिंगणे आणि गणेश धोटे हे शिक्षक सातत्याने या निराधारासाठी आधार देण्याचा प्रयत्न करत आहे .काही दिवस त्यांना योजनेचे पैसे ही मिळाले.नंतर मात्र, या योजनेचे नियम बदलले आता त्यांना मुलगी आणि आजी यांचे संयुक्त खाते हवे आहे. परंतु बँकवाले नियमावर बोट ठेवून आजी आणि नातीचे संयुक्त खाते काढून देण्यास नकार देत आहेत.शिक्षकांनी वारंवार बँकेच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊनही काही फायदा झाला नाही, तुम्ही कोर्ट ऑर्डर आणा नंतर पाहू असे उत्तर अधिकारी देत आहेत.या सर्व त्रासाला कंटाळून शिक्षकांनी या सर्व मुलांना घेऊन मेहकर तहसीलदार निलेश मडके यांची भेट घेतली व त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असला तरी या चिमुकल्यांना हक्काचे घर मिळावे यासाठी पाठपुरावा करणे गरजेचे आहे. तसेच चौथी पास झाल्यानंतर दोन मुलीच्या शिक्षणाचा मोठा प्रश्र्न निर्माण होणार आहे.

गावातील अनेक सुज्ञ आणि जाणकार मंडळी या परिवारासाठी जीव तोडतात, मदत करतात. मात्र कधी कधी तुमचा भूतकाळ तुमचा वर्तमान चांगला होऊ देत नाही अशी या चिमुकल्यांची अवस्था झाली आहे. पोटाला अन्न नाही राहायला घर नाही आणि मुली कोणाला दत्तक द्यावासा वाटत नाही अशी अवस्था आजींची झालेली आहे. त्यातच कोणीतरी देवदूत येईल आणि जनावरांसारखं असलेलं हे जिण स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंतर तरी माणसासारखं होईल या अपेक्षेत हा परिवार आहे.

तरी आजी-माजी आमदार महोदय,सामाजिक कार्यकर्ते, विविध पक्षांचे पदाधिकारी, गावकरी या सर्वांच्या दातृत्वातून एका उघड्यावर आलेल्या अनाथ परिवाराला हक्काचा निवारा आणि शिक्षणासोबत दोन वेळचे अन्न मिळेल का? भारत महासत्ता होईल किंवा नाही यापेक्षा किमान माणसाला माणूस म्हणून जगण्या इतका मोठा होईल एवढी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

## निराधार संघर्ष समितीची मेहकर येथे बैठक संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** येथील विश्रामगृह मेहकर येथे २७ मार्च रोजी राष्ट्रीय लोककलावंत, दिव्यांग, निराधार संघर्ष समितीच्या वतीने लोककलावंतांच्या, दिव्यांगांच्या, आणि निराधारांच्या न्याय हक्कासाठी आढावा बैठक घेण्यात आली.

सदर बैठकीमध्ये ग्रामीण भागातील शोषित पिढीत उपेक्षित लोककलाकार कवी, गायक, साहित्यिक,वादक, अभिनेते, नाटककार, निर्माता, दिग्दर्शक, तमाशा कलावंत, वाघे मुरळी, बहुरूपी, शास्त्रीय सुगम संगीत, संगीत विशारद, ऑर्केस्ट्रा कलाकार, लावणी डान्सर, कथक नृत्यांगना,ह.भ.प. कीर्तनकार,वारकरी, सर्व प्रकारचे भजनी मंडळी कलावंत, गायक मंडळ, ब्रास बँड वादक, बँजो पार्टी कलावंत, संबळ सनई वादक, वासुदेव पांगुळ, नंदीबैलवाले, भारुड कलाकार, शाहिरी पोवाडे कलाकार, तृतीयपंथी कलाकार, तसेच सर्व प्रकारच्या कलावंताच्या न्याय हक्कासाठी चर्चा करण्यात आली. तसेच विविध मागण्या करण्यात आल्या. बैठकीला भागवत महाराज वाघ हिवरा साबळे, सुनील पवार मेहकर,



विष्णू सूर्यवंशी अमडापूर, नंदकिशोर अटक जानेफळ, गजानन बळी देऊळगाव माळी, भागवत पुंड अंजनी बुद्रुक, रमेश वानखेडे अंजनी बुद्रुक, पांडुरंग सपकाळ गणपुर, विकास बोरकर लोणी गवळी, संतोष दाभाडे उटी, वसंत अवसरमोल लोणी काळे, मंगेश वानखेडे गवंढाळा, कारभारी पाखरे दुधा, संदीप सरदार कळपविहीर, समाधान सरदार कळपविहीर, सतीश इंगळे कळपविहीर, विलास मुळे पांगरी उंबर हांडे, असंख्य कलाकारांची उपस्थिती होती.

सदर बैठकीचे आयोजन हे संघर्ष समितीचे अध्यक्ष संदीपकुमार बोरकर यांनी केले होते. बैठकीमध्ये सर्वच कलाकारांनी आपापल्या भावना व्यक्त केल्या. संघर्ष समितीचे सचिव सतीश बोरकर यांनी आभार मानले. सदर बैठकीची सांगता ह.भ.प भागवत वाघ यांनी पसायदान घेऊन करण्यात आली.

## खामगांव तालुक्यातील अवसायनातील १५ संस्थांची नोंदणी रद्द होणार; आक्षेप नोंदविण्याचे सहायक निबंधकाचे आवाहन

**बुलडाणा /प्रतिनिधी :** खामगांव तालुक्यातील १५ सहकारी संस्थाची नोंदणी रद्द करण्याची कार्यवाही सहायक निबंधक सहकारी संस्थाव्दारे करण्यात येत आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम ८९(४) नुसार अवसायनातील संस्थाशी ज्या कोण्या व्यक्ती वा संस्थेविरुद्ध काही दावे असल्यास त्यांनी जाहिर सूचना प्रसिद्ध झाल्यचे तारखेपासून दोन महिन्याचे आत नोंदवावे लागणार आहे. त्यानंतर दाव्यांची दखल घेतली जाणार नाही, असे खामगांव सहकारी संस्थाचे सहायक निबंधक एस.के. गारोळे यांनी कळविले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ नुसार सहकारी संस्था अंतिम अवसायनात घेण्यात अलेल्या अहेत. या संस्थावर अवसायकाची नियुक्ती यापुर्वीच करण्यात आलेली आहे. यापुढील दाखल केलेल्या दाव्याचे अनुषंगाने कोणत्याही दावा दाखल न झाल्यास त्यांनतर १५ संस्थांची नोंदणी रद्द करण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

## अंबादास दानवे यांनी स्व.कैलास नागरे यांच्या कुटुंबीयांची घेतली सांत्वनपर भेट

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा /प्रतिनिधी :** कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी स्व.कैलास नागरे यांनी शेतकऱ्यांना पाणी देण्यात यावे, या मागणीसाठी आत्महत्या केली आहे. स्व.कैलास नागरे यांच्या कुटुंबाला विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी २७ मार्च रोजी सांत्वनपर भेट देऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी स्व.कैलास नागरे यांना आत्महत्या करावी लागते हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. खडकपूर्णामधून ओव्हर फ्लो होणारा वाया जाणारे पाणी मागितले आहे.राखीव पाणी मागितलेले नाही. १० मीटरच खोदून पाणी आणावे लागणार आहे.कोणत्याही अधिकाऱ्यांने मुख्यमंत्र्यांना मिस गाईड केले आहे.शिवसेनेच्या वतीने कैलास नागरे यांच्या कुटुंबीयांना मदत केली जाणार आहे.सिंचनाचे प्रकल्प





फक्त कागदावरच आहेत.१९६० ते ७० चे प्रकल्प अजूनही पूर्ण झालेले नाही.जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील असो तहसीलदार यांनी या संवेदनशील बाबीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. पण सरकारच बेदरकार आहे. तर, प्रशासनच का बेदरकार राहणार नाही, सरकारलाच काही घेणं देणं नाही. कोण जगत? कोण मरतं याच्याशी काही घेणं नाही आणि मग जिल्हाधिकाऱ्यालाचं काय घेणे राहील तो असेल त्याच्या मस्तीत मश्गुल आहे.मात्र, जनता एक दिवस त्यांची मस्ती जिरवेल. कोलटकर महिना सव्वा महिन्यापासून पळून गेलेला होता. मंत्र्याच्या मुलाला थायलंडला बँकॉकला जाताना विमान वापस आणतात, ताबडतोब पकडतात, त्याचा तपास होतो. छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करणाजया कोरटकरला पकडायला सव्वा महिना लागतो. त्याने कबूल केलेले आहे. त्याला शिक्षा झाली पाहिजे. दिशा सालियन लैंगिक अत्याचार प्रकरणाची सीआयडीने चौकशी केलेली आहे. तो रिपोर्ट सादर केलेला आहे. शिळ्या कढीला उत आणण्याचा प्रकार, राजकारण करण्याचा प्रकार, सीआयडीने ऑलरेडी इन्क्वायरी केलेली आहे. एसआयटी इन्क्वायरी करते आहे. सगळे झाल्यानंतर पुन्हा पुन्हा तेच विषय काढण्याला काही महत्त्व नाही. अनिल परब यांच्या घरासमोर राणेचे बॅनर या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना नितेश राणे थर्ड क्लास माणूस त्याला कोण उत्तर देणार, असे मत यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी व्यक्त केले.